महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

आपला व्यवसाय वृद्धिंगत होण्यासाठी दैनिक आवाजमध्ये जाहिरात करण्याची सुवर्णसंधी!
एक महिना - २४९९/- रु.
तीन महिने - ५९९९/- रु.
सहा महिने - ९९९९/- रु.
✲ संपादक ✲
मो. क्र. ९५४५९१०१७७/८९९९९२१९९४

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - १२ वे ■ अंक क्र. - ११ ■ शनिवार दि. १२ जुलै २०२५ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

# पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देणारे महाराष्ट्र पहिले राज्य

**दै. आवाज वृत्तसेवा...**

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेत राज्यातील लाखो पशुपालकांना मोठा दिलासा दिला आहे. या धोरणात्मक सुधारणेमुळे दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन व वराहपालन व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार असून, त्यांना नव्या सवलतींचा लाभ होणार आहे. या निर्णयानुसार, पशुधन आधारित सर्व व्यवसाय आता कृषी व्यवसायाच्या समकक्ष मानले जातील, अशीघोषणापशु संवर्धनमंत्री मा. श्रीमती पंकजा मुंडे यांनी शुक्रवारी (दि.११ जुलै २०२५) विधीमंडळात केली.

पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्षदर्जादेण्याबाबत विभागाने सादर केलेल्या प्रस्तावावर मंत्रिमंडळाने चर्चा केली व चर्चे अंती याविषयावर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

१. पशुसंवर्धन व्यवसायाला कृषि समकक्ष दर्जा देण्यास मान्यता.

२. २५,००० मांसल कुक्कुट पक्षी / ५०,००० अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी क्षमतेच्यातसेच ४५,००० क्षमतेच्या हॅचरी युनिटच्या कुक्कुटपालन व्यवसायास, १०० दुधाळ जनावरांचे संगोपन, ५०० मेंढी /शेळीपालन व २०० वराह या पशुसंवर्धन विषयक व्यवसायासाठी वीज दर आकारणी कृषी इतर या वर्गवारीनुसार न करता कृषि वर्गवारीप्रमाणे करण्यास मान्यता.

३. उपरोक्तप्रमाणे पशुपालन व्यवसायास स्वतंत्र व्यवसाय न समजता शेती व्यवसाय समजून ग्रामपंचायत कर दरात एकसमानता आणण्याकरिता कृषि व्यवसायास ज्या दराने कर आकारणी केली जाते, त्याच दराने कर आकारणी करण्यास मान्यता देण्यात आली.

४. कृषिप्रमाणे पशुपालन व्यवसायास कर्जावरील व्याज दरात सवलत देण्यास मान्यता देण्यात आली.

५. कृषीप्रमाणे कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास सवलत देण्यास मान्यता.

६. सदर धोरणाच्या अंमलबजावणीसाठी अतिरीक्त नियतव्यय उपलब्ध करुन देण्यास मान्यता.



या निर्णयांमुळे शाश्वत शेतीला चालना मिळेल, ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती होईलआणि शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य वाढेल. राज्यातील सुमारे ७५ लाख कुटुंबेपशुसंवर्धनाच्या व्यवसायात आहेत, त्यांना याचा थेट लाभ होणार आहे. खऱ्या अर्थानं हा ऐतिहासिक निर्णय आहे. राज्यामधील सर्व पशुपालकांना याचा मोठा फायदा होऊन पशुसंवर्धन विभागाच्या वाढीस याची मोठी मदत होणार आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे महाराष्ट्रातील पशुसंवर्धन क्षेत्रात क्रांती घडेल, असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्रीश्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रीतथामंत्री (वित्त व नियोजन) श्री. अजित पवार यांनी व्यक्त केलाआहे.

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलर पर्यंत पोहोचविण्यासाठी पथदर्शी आराखडा अहवाल शासनास सादर केला आहे. सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक सल्लागार परिषदेने जे घटक उत्पन्न वाढीस चालना देऊ शकतील, असे ८ घटक सुनिश्चित केले आहेत. यामध्ये कृषि व संलग्न या घटकाचा समावेश आहे. सद्यस्थितीत राज्याच्या सकल उत्पन्नात कृषि क्षेत्राचा वाटा १२ टक्के इतका असून, कृषि क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा वाटा २४ टक्के इतका आहे. निती आयोगाने सन २०२१ च्या अहवालात पशुसंवर्धन व्यवसायापासून देशाच्या /राज्याच्या सकल उत्पादनात पशुसंवर्धन व्यवसायाचा सहभाग वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याची शिफारस केली होती.

निती आयोगाचे निरीक्षण:

नितीआयोगाच्या सन २०२१ च्याअहवालानुसार, सन २०११-१२ ते २०१७-१८ याकालावधीत कृषी क्षेत्रातील पिकांचा जीडीपीमधील वाटा १२.१ टक्क्यांपासून ८.७ टक्क्यांपर्यंत कमी होतगेलाआहे. याउलट पशुसंवर्धनाचा वाटा वाढत जाऊन तो ४ टक्क्यांवर स्थिरावला आहे. सन २०३० पर्यंतदूध, अंडी, मांसयांची एकूण मागणी सुमारे १७ कोटी इतकी राहणार असून, ती तृण धान्यांपेक्षा अधिक असेल. पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये नियोजनपुर्वक व शास्त्रीय पध्दतीचे व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष होत असल्याकडेही निती आयोगाने लक्ष वेधत, त्यावर उपाययोजना करुन शेतकऱ्यांची / पशुपालकांची आर्थिक जोखीम कमी करण्याची शिफारस केली होती.

पशुपालकांना भेडसावणाऱ्या कृषि वीज दराच्या तुलनेत जास्त वीज दर,सोलर एनर्जीसाठी अनुदानाचा अभाव, ग्रामपंचायत कर, शेती कर्जाच्या व्याजदराच्या तुलनेत अधिक व्याजदराची आकारणी या अडचणींचे निराकरण झाल्यास पशुपालन व्यवसायाकडे लोकांचा कल वाढून पशुजन्य उत्पादनात वाढ होईल. उद्योजकतावाढ, व्यावसायिक नफ्यात वाढ तसेच स्पर्धात्मक वातावरण यामुळे पशुजन्य उत्पादित बाबीस मुल्यवर्धन साखळीची निर्मिती, शेतीप्रमाणे गट पद्धतीने पशुसंवर्धन, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब यासारख्या बाबीमध्ये आपोआप वाढ (ीश- ींश्रींरपीं ळपलीशरीश) होईल.

प्रतिक्रिया:

पशुसंवर्धनाच्या व्यवसायास प्रोत्साहन देताना कृषि व्यवसायाप्रमाणे सवलती देणे आवश्यक असल्याने राज्यसरकारने पशुपालन व्यवसायास कृषि समकक्ष दर्जा दिलाआहे. विभागाच्या वाटचालीतील हा एक ऐतिहासिक निर्णयअसून, या निर्णयामुळे भविष्यात पशुसंवर्धनाच्या माध्यमातून महाराष्ट्राचे ग्रामीणअर्थचक्र गतिमान होईल, अशी मला खात्रीआहे.




श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित
**श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**
(पुणे विद्यापीठ संलग्न)
वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

✲ शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून
B.A./B.Com/B.Sc साठी प्रवेश देणे सुरू आहे.
प्रवेश पात्रता - १२ वी पास (आर्टस्, कॉमर्स, सायन्स)




✲ वैशिष्टे ✲
✲ उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग
✲ भव्य प्रशासकीय व महाविद्यालय इमारत
✲ सि.सि.टि.व्ही. कॅम्पस
✲ ग्रथालय व वाचनालय स्वतंत्र इमारत
✲ मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह सुविधा
✲ भव्य सेमिनार हॉल व खेळाचे मैदान
✲ मर्यादित विद्यार्थी संख्या

प्रवेशासाठी संपर्क :- ९९२२१७२७९९
पत्ता - कै. गंगाराम धनसिंग राठोड शैक्षणिक संकुल, महादेव रोड, वसंत नगर, पो.जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक.
✲ प्राचार्य :- मोबा. 9922172799

श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित
**श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**
(पुणे विद्यापीठ संलग्न)
वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया
(राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०) शैक्षणिक वर्ष २०२५-२६

**पदवी अभ्यासक्रम**

| | | |
|---|---|---|
| B.A.<br>(Bachelor of Arts Specialization)<br>B.A. English<br>B.A. Marathi<br>B.A. Hindi<br>B.A. History<br>B.A. Geography<br>B.A. Economice<br>B.A. Politics | B.Sc.<br>(Bachelor of Science Specialization)<br>B.Sc. Chemistry<br>B.Sc. Physics<br>B.Sc. Micro Biology<br>B.Sc. Botany<br>B.Sc. Zoology | B.Com.<br>(Bachlor of Commerce)<br>Business Administration<br>Marketing |

**प्रवेशासाठी खालील प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक असेल**
१) ॲडमिशन फॉर्म
२) मुळ कागदपत्र (Orignal L.C.) व दोन स्वयंसाक्षांकित प्रती
३) गुणपत्रकाच्या दोन स्वयंसाक्षांकित प्रती
४) जातीचा दाखला व दोन स्वंयसाक्षांकित प्रती (आवश्यक असल्यास)
५) आधार कार्ड दोन स्वयंसाक्षांकित प्रती
६) शिक्षणात खंड असेल तर गॅप सर्टिफिकेट आपल्याकडे स्कॅन स्वरूपात ठेवावा.

टिपः महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला सर्टिफिकेट आपल्याकडे स्कॅन स्वरूपात ठेवावा. सदर कागदपत्र शिष्यवृत्ती फॉर्म भरण्यासाठी आवश्यक आहे.

✲ अधिक माहितीसाठी संपर्क ✲
✲ प्राचार्य :- मोबा. 9922172799



# युवा वर्गामध्ये ह्रदयविकारांचा वाढता आजार चिंताजनक!

**दै. आवाज वृत्तसेवा...**

पुर्वी ह्रदयविकाराचे आजार (हार्डअटॅक) याबाबत एक वयोमर्यादा होती साधारणतः वयाच्या ६० वर्षांनंतर या आजारांचे प्रमाण जास्त रहायचे. परंतु गेल्या काही वर्षांत ३० ते ५० वर्षे वयोगटामध्ये हृदयविकाराच्या आजारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. कारण गेल्या काही वर्षांमध्ये प्रत्येक व्यक्तींची रहानिमानाची, खानपानाची, मादक द्रव्ये व अन्य व्यसन यामुळे दिनचर्येच्या शैलीमध्ये मोठ्या प्रमाणात बदलाव आल्याचे दिसून येते. पंजाब मधील फिरोजपुर मधील गुरूहर सहाय या मैदानावर दिनांक २९ जून २०२५ रविवारला हरजीत सिंह नामक युवा क्रिकेट खेळाडू बैटींग करतांना छक्का मारला व अचानक हार्ट अटैक आला व तो तिथेच पडला आणि त्याचा मृत्यू झाला ही धक्कादायक बाब आहे. यामुळे सर्वांचेच ह्रदय हळूहळून आले व खेळाडूंमध्ये शोककळा पसरली. यापुर्वीही मुंबईमध्ये जून २०२४ मध्ये क्रिकेट मैचच्या दरम्यान राम गणेश तेवर नामक खेळाडूने छक्का मारल्या बरोबर हृदयविकाराचा झटका आला व क्रिकेट खेळतांना अशीच ह्रदयद्रावक घटना घडली व या ४२ वर्षीय या खेळाडूचा मृत्यू झाला. २०२४ मध्ये अशाप्रकारे पुणे येथील गरवारे स्टेडियममध्ये इमरान पटेल नामक खेळाडू ३५ वर्षीय क्रिकेट मैच खेळताना हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू झाला. यावरून स्पष्ट होते की अटैकचे (ह्रदयविकाराच्या आजारांचे) प्रमाण दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ह्रदयविकाराच्या मृत्यूचे अनेक कारणे असू शकतात मादक द्रव्ये सेवन करणे, धुम्रपान, तंबाखू, गुटका, मद्य सेवन यांचाही ह्रदयविकारावर मोठ्या प्रमाणात गंभीर परिणाम होतो व पुढे चालून मृत्यूचे कारण बनत असते. त्याचप्रणाणे मोबाईलचा जास्त प्रमाणात वापर, वाढता तनाव, अनियमित जीवनशैली, दिनचर्येत फास्ट फूडचे वाढते प्रमाण, आहाराची ढासळती गुणवत्ता, वेळोवेळी आरोग्याची काळजी न घेणे व व्यायामाचे कमी प्रमाण, वाढते लठ्ठपणा, इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम युवावर्गामध्ये होत असल्याने ह्रदयविकाराच्या आजारांचाधोका वाढतो आहे. युवावर्गामध्ये ह्रदयविकाराच्या आजारांमध्ये भर टाकली(बीपी व शुगर) डायबिटीजने हाई ब्लड शुगरचा सरळ प्रभाव ह्रदयविकाराच्या आजारांवर होतो. या आजारांचे मुख्य कारण म्हणजे मसालेदार पदार्थ, ऑयली फूड, फास्ट फूड, अती कोल्ड्रिंक्स घेणे आणि मिठाई यामुळे डायबिटीजचे प्रमाण वाढुन सरळ ह्रदयविकारांचे आजार होत आहे किंवा होवू शकतात.


रमेश लांजेवार
(प्रदेश प्रवक्ता)
(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

सोबतच सध्याच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे व वाढत्या प्रदूषणामुळे सुध्दा ह्रदयविकाराचे आजार दिसून येतात. आपण पाहिले की सध्याच्या परिस्थितीत अनेक अभिनेता, गायक, हास्य कलाकार आणि निर्देशक याचा ह्रदयविकाराच्या आजारांनी मृत्यू झाल्याचे आपण पाहिले. यात वयोमर्यादा ३०,४०,५० वर्षे अशा प्रमाणे कमी वयोमर्यादा आहे. या वयात ह्रदयविकाराच्या आजारांने मृत्यू (हार्डअटॅक) होत असेल तर ही बाब अत्यंत चिंताजनक, गंभीर व धक्कादायक आहे. त्यामुळे वाढते ह्रदयविकारांचे आजार पहाता सर्वांनीच आपल्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे.

# येणारा कॉल रेकॉर्ड करतच जा... भले तो कितीही जवळचा असेल!

**दै. आवाज वृत्तसेवा...**

समाज डिजिटल होत चालला आहे, आणि संवाद अधिक वेगवान, सुलभ आणि सहजसाध्य झालाय. पण त्याचबरोबर वाढला आहे तो फसवणुकीचा धोका, भावनिक खेळ, आर्थिक शोषण, आणि तुटलेली नाती तपासण्याचा बनाव करणारे जुने लोक. आज येणारा कॉल रेकॉर्ड करतच जा... भले तो कितीही जवळचा असेल! हे वाक्य केवळ सावधगिरीचा सल्ला नाही, तर अनुभवाने शिकलेल्या अनेकांच्या दु:खद गोष्टींचा सार आहे.



चेकमेट
भगवान सोनवणे
संपादक
मो. ९५४५९१०१७७

। जुन्या मैत्रीचा पुन्हा उदय – पण आता सावधगिरीची गरज

आपण म्हणतो की माणूस ६० वर्ष जगतो. त्याच्या आयुष्यातील अनेक फेऱ्या, वळणे, संबंध, आठवणी, आणि विस्मरणं असतात. वयाच्या ६० व्या वर्षी, अचानक एखादा शालेय मित्र, कॉलेजची मैत्रीण किंवा जुन्या कॉलनीतील शेजारी फोन करतो – आणि संवाद पुन्हा उघडतो. काय रे, किती दिवसांनी... आठवतंय का आपलं ते जुनं ग्रुप? तुझ्याशी एक खास गोष्ट शेअर करायचीय...

थोडी अडचण आहे, मदत करू शकशील का?

हे सगळं भावनिक रस्त्यावरून सुरू होतं – आणि आर्थिक अथवा वैयक्तिक फायद्यावर संपतं. ही साखळी ओळखायला आपण कमी पडतो कारण त्या काळचा माणूस आपला वाटतो.

। उदाहरण: मैत्रीची आठवण की मोहिमेचा सापळा?

वडिलधाऱ्यांच्या वयात एक अनुभवी व्यक्ती – ५८ वर्षांची – एका जुन्या वर्गमैत्रिणीच्या फोनवरून भावनिक होतो. ती म्हणते, तुझा नंबर शोधायला खूप वेळ लागला, पण तुझी मदत लागतेय. काही कॉल्सनंतर संबंध पुन्हा जुळतो, आणि ती तिच्या वैयक्तिक समस्यांसाठी काही रक्कम मागते.

रक्कम दिल्यावर, ती गायब. तो व्यक्ती मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या दोन्ही गोंधळलेला होतो. जर कॉल्स रेकॉर्ड केले असते, तर पुरावा म्हणून पुढे वापर करता आला असता.

। विश्वास ठेवायचा, पण डिजिटल युगात सावध राहायचं

जुन्या काळचे लोक, आठवणी, गोड गप्पा – हे सर्व आपल्याला भावतात. पण आजचा काळ केवळ भावनांवर चालत नाही. तो पुराव्यांवर, सतर्कतेवर आणि डिजिटल जागरूकतेवर आधारित आहे.

आपण विश्वास ठेवतो, हे चांगलं. पण विश्वासाचं स्थान देताना जर रेकॉर्डिंगचा एक बटन ऑन केला, तर तो आपल्या नात्यांवर संशय न टाकता स्वतःचं संरक्षण करणारा निर्णय ठरतो.

। कायद्याच्या चौकटीत सुरक्षितता

भारतात, स्वतःच्या संरक्षणासाठी कॉल रेकॉर्ड करणे कायदेशीर आहे, जोपर्यंत त्याचा गैरवापर केला जात नाही. विशेषत: जुन्या संबंधांमध्ये आर्थिक किंवा वैयक्तिक वाद निर्माण झाल्यास, कॉलचे रेकॉर्डिंग एक महत्त्वाचा तथ्याधारित पुरावा ठरू शकतो.

। निष्कर्ष: आयुष्यभराच्या आठवणी जपताना, आजची सावधगिरी विसरू नका

आपण ६० वर्ष जगतो, त्यात १६ व्या वर्षी भेटलेली मैत्रीण, २५ व्या वर्षी सोडलेला मित्र, ३५ व्या वर्षी दुरावलेला सहकारी – हे सगळे पुन्हा आयुष्यात येऊ शकतात. त्या वेळी मन मोठं ठेवा, संवाद ठेवा, पण कॉल रेकॉर्ड करत ठेवा.

कारण कधी कधी, गेल्या आठवणींना उजाळा देणारे लोक, आजच्या शांत आयुष्यात वादळ आणू शकतात. सावध रहा – कारण फसवणूक ओळखीच्या नावाने येते.

# अंबासन येथील मविप्रच्या नुतन विद्यालयात गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

सटाणा प्रतिनिधी- ता. १० : 'गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णु, गुरुर्देवो महेश्वर' या सुभाषिताचा प्रत्यय देणारा एक मनमोहक व आदरयुक्त कार्यक्रम अंबासन येथील मविप्रच्या नुतन विद्यालयात पार पडला. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने विद्यालयातील इयत्ता दहावी 'अ' आणि 'ब' वर्गाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांना पुष्पगुच्छ देऊन अभिवादन केले आणि त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली.



कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात झाले. विद्यालयाचा परिसर विद्यार्थ्यांच्या स्नेहगंधाने आणि गुरूंविषयीच्या श्रद्धेने भारावलेला दिसून येत होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक व्ही. एन. पाडवी उपस्थित होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमात विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित शिक्षकांमध्ये विजय पाटील, आत्माराम बच्छाव, संजय जाधव, जिभाऊ खैरनार, सतीश ठोंबरे, दीपक दाभाडे, महेंद्र पाटील, दत्तू मोहिते, विनोद शिवदे, जयकुमार लाडे, श्रीमती मनीषा भामरे, संगीता आहेर, शोभाबाई सावळा, आरतीदेवी अहिरे (देवरे), वैशाली पानसरे, किरण दाणी, मोनिका सोर आणि महेश पाटील यांचा समावेश होता. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये बाळू ठाकरे, देविदास मोरे, सुरेश पानपाटील आणि राजू माळी हे देखील कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमात महेंद्र पाटील यांनी संत नामदेवांच्या कथा सांगून गुरुपौर्णिमेचे अध्यात्मिक व सांस्कृतिक महत्त्व विशद केले. त्यानंतर जिभाऊ खैरनार यांनी आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या प्रेमळ आदराचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी केलेल्या सादरीकरणाने सर्व शिक्षक भारावून गेले होते. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि सौंदर्यपूर्ण पद्धतीने करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या हस्ते प्रत्येक शिक्षकांचे पुष्पगुच्छ व शुभेच्छापत्र देऊन स्वागत करण्यात आले. संपूर्ण वातावरण एक वेगळ्याच भक्तिमय व अध्यात्मिकतेने भरले होते.

# पिंपळगाव लेप प्राथमिक शाळेत गुरुपौर्णिमा उत्सव गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून साजरा




**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे

पिंपळगाव लेप : या शाळेतील माजी विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२४/२५मधे इयत्ता १० वी १२ वी परीक्षेत गुणवंत झाले. म्हणून एकूण १२ विद्यार्थ्यांचा गौरव पुस्तक, पेन, पुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तर गावातील ग्रामस्थांनी गुरुपौर्णिमेनिमित्त शाळेतील सर्व शिक्षक गुरू जणांचा गौरव केला.

यावेळी दगुजी सोनवणे यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व पटवून दिले. तर नईम मन्यार यांनी गुरुपौर्णिमा निमित्त सुमधुर गीत सादर केले. माणिकराव रसाळ यांनी जीवनात गुरुचे महत्त्व किती आहे. हे सांगितले. तर मुख्याध्यापक जालिंदर सोनवणे यांनी जीवनातील गुरुचे स्थान विषद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किरण गागरे हे होते. याप्रसंगी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष माणिकराव रसाळ उपाध्यक्ष मधुकर ढोकळे, ग्रामपंचायत सदस्य विनोद अहिरे, दिगंबर दौंडे, शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्य वैशाली सोनवणे, नंदा दुनबळे, रुपाली दाते, सुनिल दुनबळे, चांगदेव दौंडे,

तसेच मुख्याध्यापक जालिंदर सोनवणे, कल्पना बोचरे, नईम मन्यार, संतोष गायकवाड़, योगेश देशमुख, दगुजी सोनवने, शीतल सानप, बाबासाहेब गोरे, भरत यादव, योगिता पोटे, वैष्णवी दौंडे यांच्यासह शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# दोधेश्वर नाका ते साईबाबा मंदिर भाक्षी रोड डांबरीकरणाची मागणी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

तुषार रौंदळ

सटाणा प्रतिनिधी:- सटाणा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक.१ व २ मधून जाणाऱ्या दोधेश्वर नाका ते साईबाबा मंदिर भाक्षी रोड या मुख्य रस्त्याचे प्रलंबित डांबरीकरणाचे काम पूर्ण होणेबाबत.. तसेच साईबाबा मंदिर ते जयमल्हार लॉन्सपर्यंतच्या दुभाजकांना रंगरंगोटी करून तातडीने पथदीप सुरू करणेबाबत..व भाक्षी रस्त्यावरील सर्व कॉलनी रस्ते मुख्य भाक्षी रस्त्याला डांबरीकरण करून जोडणेबाबत..प्रभागातील स्थानिक नागरिकांने माझ्याकडे वेळोवेळी तक्रार केले असता यांची दखल घेत आज दि.११-०७-२०२५ रोजी सटाणा नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी सौ.ज्योती भगत मॅडम व सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता श्री विकास दळवी साहेब यांना निवेदन देण्यात आले, याबाबत



येत्या आठ दिवसांत कार्यवाही होऊन प्रत्यक्ष कामास सुरवात करावी. अन्यथा साखळी उपोषण करून करून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल यांस सर्वस्वी सटाणा नगरपरिषद व सार्वजनिक बांधकाम विभाग जबाबदार राहील असा ईशारा देण्यात, आला यावेळी प्रभाग क्रमांक.१ व २ मधील स्थानिक नागरिक उपस्थित होते.!!

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# एकरूखे नवीन एस्केप कामाचा शुभारंभ माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्या हस्ते पार पडला

**दै. आवाज वृत्तसेवा...**

एकरूखे (पुजा सोनवणे):- नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे जलसंपदा खात्याचे मंत्रीपद आल्यापासून मतदार संघातील जलसंपदा विभागातील प्रलंबित कामांना मंजुरी मिळत असल्याने कामांना गती आली आहे, एकरूखे गावासाठी स्वतंत्र एस्केप मंजुरीसाठी गावकऱ्यांचे पाच दशकापासून प्रयत्न चालू होते, नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी जलसंपदा खात्याची जबाबदारी स्विकारल्यानंतर सर्व प्रथम या एस्केपच्या कामाला मंजुरी दिल्यानंतर एकरूखे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे, या एस्केपमुळे एकरूखे गावासह परिसरातील रांजणगाव, अस्तगांव, पंधराचारी, रामपूरवाडी येथील हजारो शेतकऱ्यांना लाभ होणार आहे, प्रत्यक्ष कॅनॉलपासून स्वतंत्र गेटवरून एकरूखे तळ्यात पाणी सोडण्यात येणार असून यासाठी अस्तगाव पाटापासून जुना 'चर' वीस फूट रुंद उकरून खोलीकरण करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे या खोलीकरणाच्या दोन्ही बाजूने असलेल्या शेतकऱ्यांना देखील याचा मोठा लाभ होनार असुन विहीरी आणि बोरवेलची पाणी पातळी वाढून अधिकचे क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे, तसेच ज्या चराने हे पाणी एकरूखे गावातील पाझर तलावात जाणार आहे त्या तलावाचे सद्य स्थितीत क्षेत्र कमी राहिले असले तरी मूळ अधिग्रहित क्षेत्र मोठे असून मोठा जलसाठा निर्माण होण्यासाठी सदर तलावाचे सर्वच्या सर्व अधिग्रहित क्षेत्र लवकरात लवकर खोलीकरण रुंदीकरन करून तलाव व तलावाचे संपूर्ण गाळमुक्त केल्यानंतर तलावाची साठवण क्षमता आणि परकोलेशन क्षमता वाढेल आणि एस्केपचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांच्या विहिरीची बोरवेलची पाणी पातळी वाढेल अशी देखील मागणी शेतकऱ्यांनी सुजय विखे पाटील यांना केली आहे, सदर एस्केप कामाच्या शुभारंभ झाल्यामुळे एकरूखे ग्रामस्थांच्या अनेक वर्षाचा लढ्याला यश आले असून शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे, या उद्घाटन प्रसंगी बोलतांना सुजय विखे पाटील म्हणाले की नामदार राधाकृष्ण विखे जलसंपदा मंत्री झाल्यानंतर त्यांनी सर्व प्रथम एकरूखे एस्केपच्या कामाला मंजुरी दिली आहे, अनेक वर्षांची तुमची मागणी पूर्ण झाली असून आता एकरूखे गावच्या पाण्याची चिंता मिटणार आहे, राजकारणात अनेक लोक फक्त आश्वासने देतात कामे करत नाही, मात्र विखे पाटील परिवार दिलेल्या आश्वासनाचे काम पुर्ण करून दाखवतात आणि शब्द पाळतात, गोदावरी पाटाच्या राहाता अस्तगांव गणेशनगर वाकडी ते शेवटपर्यंत रुंदीकरणाचे काम प्रगतीपथावर सुरु असून ते काम लवकरच पुर्ण होईल, त्यानंतर शेतकऱ्यांची मागणी होती की उप चाऱ्या आणि पोटचाऱ्या देखील उकरून द्याव्यात त्यामुळे एक नंबर चारी पासून वीस नंबर चारीवरील शेतापर्यंत जाणाऱ्या उपचाऱ्या पोटचाऱ्या देखील मोकळ्या करण्यात येतील त्या कामांना देखील



मंजुरी देण्यात आली असल्याचे सांगितले, राहाता येथे पाटबंधारे विभागाचे नवीन कार्यालय मंजूर झाले असून राहात्यात छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुला शेजारील पाटबंधारे विभागाच्या जागेत लवकरच कार्यालयच्या कामाला सुरवात होणार आहे, नामदार विखे पाटील यांच्या कार्यकाळात नवीन पंचायत समिती कार्यालय इमारत झाली, नवीन पोलीस स्टेशन इमारतिचे काम सुरु झाले आहे त्याच सोबत तालुका रुग्णालयाचा देखील विस्तार करण्यात येणार असुन राहाता नगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनेला मंजुरी मिळाली असुन राहातेकरांना नळाद्वारे शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे, विरभद्र मंदिर परिसराचे कॉंक्रेटिकरन काम देखील लवकरच सुरवात करणार असेल्याचे सांगितले आहे आपण घेतलेल्या निर्णयामुळे शिर्डीसह परिसर भयमुक्त आणि गुन्हेगारी मुक्तीकडे वाटचाल करत आहे, याच बरोबर प्रवारा कारखान्याच्या वतीने नाममात्र शुल्कात उसाचे रोपे सुरवात करणार असुन मी रोपे देतो पाणी देतो तुमचे पिक जगवण्याची जबाबदारी देखील मीच घेतो मात्र ऊस प्रवरेला द्या असेही सुजय विखे पाटील म्हणाले, यावेळी एकरूखे ग्रामस्थांच्या वतीने जालिंदर गाढवे यांनी मनोगत व्यक्त करत मंजूर कामाबद्दल नामदार राधाकृष्ण विखे पाटील, शालिनीताई विखे पाटील व सुजय विखे पाटील यांचे आभार मानले, या वेळी राहाता तालुक्यातील अधीकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी, नगरपालिका पदाधिकारी, शेतकरी, एकरूखे राहाता अस्तगाव रांजणगाव येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते, उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी पाटबंधारे विभागाचे सोनल शहाणे, आल्हाट, खैरनार, कवडे, खेमनर, जंगले, गिते ई अधिकारी उपस्थित होते तर एकरूखेचे ग्रामविकास अधिकारी प्रमोद कानडे, सहाय्यक कृषि अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, एकरूखे सरपंच जिर्तेंद्र गाढवे, बाजार समितीचे संचालक जालिंदर गाढवे, माजी उपसरपंच जगन्नाथ सोनवणे, रामदास सोनवणे, माजी संचालक देवेंद्र भवर, भाऊसाहेब गाढवे, श्री गणेशचे माजी चेअरमन मुकुंदनाना सदाफळ, डॉ स्वाधीन गाडेकर, राजेंद्र वाबळे, सचिन मेहेत्रे, दशरत तुपे, मच्छिन्द्र आभाळे, वेणूनाथ बोर्डे, रघुनाथ बोर्डे, रविंद्र गायधने, गोरख बोर्डे, गणेश थोरात, ज्ञानेश्वर गाढवे, बाबासाहेब पाटील, बाबासाहेब गाढवे, शामराव गाढवे, रामदास सातव, मिनीनाथ आग्रे, गोरक्षनाथ मोटे, संदीप क्षीरसागर, सलीम इनामदार, बळवंत गाढवे, रवींद्र गाढवे, भाऊसाहेब कार्ले, नवनाथ कार्ले, भास्कर आभाळे, भाऊसाहेब मोटे,बाळासाहेब आग्रे, गोरख सापिके, राजेंद्र वायकर, हर्षल सातव, जयसिंग सातव, रवी कार्ले, योगेश आग्रे, काका भवर, संजय खिलारी विनोद गाढवे, ग्रामपंचायत सदस्य गायत्री गाढवे, सुमनबाई खुरसने, लीलाबाई गाढवे, शांताताई सातव, मनीषाताई सातव ई मान्यवर उपस्थित होते

***

# बिटको महाविद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिकरोड :-

प्रत्येक वेळी सातत्याने मार्गदर्शन, संस्कार व आपल्या कामांना प्रेरणा देणाऱ्या गुरुचे आपल्या दैनंदिन जीवनात योगदान मोलाचे आहे. गुरु म्हणजे प्रत्येक अनुभवात प्रत्येक क्षणात भेटणारा एक दिव्य आत्मप्रकाश असतो. जो नियमित साधना करतो तोच यशाचा वारस ठरतो , असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. कृष्णा शहाणे यांनी केले.

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या नाशिकरोड येथील बिटको महाविद्यालयात कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या गुरुपौर्णिमेप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. कृष्णा शहाणे अध्यक्षस्थानी होते. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी, उपप्राचार्य डॉ. अनिलकुमार पठारे, डॉ. सतीश चव्हाण, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या रागिणी भवर , पर्यवेक्षिका प्रणाली पाथरे, कार्यक्रमाच्या संयोजिका मीना शिंदे, संजीवनी निजामपूरकर, विद्यार्थी सभा कार्याध्यक्ष सुहास माळवे, सांस्कृतिक विभाग प्रमुख संजय परमसागर, डॉ. साहेबराव निकम, राधा पाटील, मीनल पाटील यासह नीलिमा कुलकर्णी, एम. ए. कुटे, किरण पाटील तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते .

विद्यार्थ्यांमध्ये संस्कार मूल्य रुजवणाऱ्या व त्यांच्यामध्ये जिज्ञासूवृत्ती जोपासणाऱ्या शिक्षकांना यावेळी गुरुपौर्णिमेनिमित्त हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या . याप्रसंगी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या रागिनी भवर आणि पर्यवेक्षिका प्रणाली पाथरे यांनी विद्यार्थ्यांना यथोचित मार्गदर्शन करतांना गुरूंच्या कृपाप्रसादामुळेच आयुष्य जगण्याला खरा अर्थ मिळतो. गुरुपौर्णिमा कृतज्ञता श्रद्धा आणि विनम्रता यांचे प्रतीक आहेअसे सांगितले . कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही यावेळी शिक्षकांना गुलाबपुष्प व पेन भेट देऊन शिक्षकांप्रति आदरभाव व्यक्त केला .यात कस्तुरी देवरे, समीक्षा सोनवणे, नियती उगले, आयुषी केला, मालविका नायर, ईशान आठवले, चिरंजीव शेरकर, श्रेया शर्मा, वितीषा पगारे, तपस्वी पगारे, कृष्णा शिरसाठ, रोशन कुशारे, निखिल डहाळे, श्रीराज ढवळे यांनी आपल्या भावना शब्दात व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्ताविक तपस्वी पगारे हीने केले तर आभार मालविका नायर हिने मानले. भूगोल विभागातही शिक्षक दिन विद्यार्थ्यांनी साजरा केला.

***

## रत्नाप्पा कांबळे यांचे निधन

**दै. आवाज वृत्तसेवा...**



कागल -रत्नाप्पा सदू कांबळे (सब पोस्ट मास्तर मुंबई) यांचे राहत्या गावी गोरंबे, तालुका-कागल येथे अल्पशा आजाराने दिनांक -१० जुलै २०२५ रोजी दुःखद निधन झाले असून त्यांच्या पश्चात मुले, मुली, पुतणे, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे उत्तर कार्य रविवार दिनांक १३ जुलै २०२५ रोजी राहते गावी गोरंबे येथे आहे.

# विद्यार्थ्यांच्या जीवनात गुरूचे महत्त्व अविस्मरणीय - संगीता पाटील

## साके येथे सुभद्रामाता हायस्कुलमध्ये गुरूपौर्णिमा उत्साहात

**दै. आवाज वृत्तसेवा...**

जे.के.गोरंबेकर/ कागल- विद्यार्थ्यांच्या आयुष्यात गुरु (शिक्षक) हे केवळ पुस्तकी ज्ञान देणारे नसून, त्यांचे व्यक्तिमत्व घडवणारे आणि भविष्याची दिशा ठरवणारे महत्त्वाचे मार्गदर्शक असतात. गुरूंना भारतीय संस्कृतीत नेहमीच उच्च स्थान दिले गेले आहे. 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः, गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः' या श्लोकातूनच गुरूंचे श्रेष्ठत्व अधोरेखित होत असल्याचे प्रतिपादन प्राध्यापिका सौ. संगीता पाटील यांनी केले.

साके ता.कागल येथील कै.सौ.सुभद्रामाता आशीर्वाद विद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त



आयोजित पालकांचे पाद्यपुजन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक दत्तात्रय ससे होते.

कार्यक्रमाची सुरवात दीपप्रज्वलनाने झाली. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांचे पाद्यपुजन करून गुरूंना,पालकांना आदराने वंदन केले आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शाळेमार्फत आयोजित केलेल्या या कार्यक्रमासाठी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या आई- वडिलांच्या सुस्कांरात रहावे,त्यांचा आदर,सन्मान राखावा,वेसनापासून दूर रहावे आणि भविष्यात त्यांचे स्वप्न साकर करावे यासाठी विद्यार्थ्यांना शाळेमार्फत शपथ देण्यात आली. एक सेल्फी गुरूसोबत... या नवीन उपक्रमाद्वारे विद्यार्यां नी आपल्या आई ,गूरूजनांसोबत सेल्फी घेत गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करून गुरूपौर्णमा साजरी केली. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या गुरूंना भेटवस्तू देऊन त्यांचे आशीर्वाद घेतले.

कार्यक्रमास तानाजी सामंत,टि.व्ही. पाटील,सिद्धेश ससे, व्ही.टी.किल्लेदार,एस.एस.चव्हाण,विश्वास जाधव,शिक्षक पालक उपस्थित होते. स्वागत पी.एच.पाटील यांनी केले आभार डि.एस. पाटील यांनी मानले.

# इ. ५वी शिष्यवृत्ती परीक्षेत सार्थक जाधव नाशिक तालुक्यात प्रथम

**दै. आवाज वृत्तसेवा...**

वेहेळगांव ता - जि. प. प्राथमिक शाळा गंगावाडी (केंद्र पळसे, ता. नाशिक) येथील विद्यार्थ्याने गुणवत्तेचे शिखर गाठले आहे. इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत सार्थक निलेश जाधव याने उत्तम कामगिरी करत नाशिक तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.सार्थकच्या या उल्लेखनीय यशामागे शाळेतील मार्गदर्शक शिक्षिका सौ. प्राची निलेश जाधव व श्रीम. कल्पना राजाराम ढिकले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. श्रीमती मिता चौधरी (इएज, नाशिक) यांचेही विशेष पाठबळ मिळाले.



तसेच केंद्रप्रमुख श्री. लक्ष्मण राठोड व विस्तार अधिकारी श्री. भाऊसाहेब जगताप यांनी वेळोवेळी योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले.

सार्थकच्या यशाचे खरे शिल्पकार म्हणजे त्याचे वडील व प्रमुख मार्गदर्शक श्री. निलेश रमेश जाधव यांचे सातत्याने मिळालेले पाठबळ.

सार्थकच्या या घवघवीत यशामुळे गंगावाडी शाळेचे नाव उज्वल झाले असून परिसरात आनंदाचे वातावरण आहे. त्याचे पळसे केंद्रप्रमुख श्री जगन जाधव व तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी श्रीम.देवकर मॅडम यांनी अभिनंदन केले.

# पन्हाळसाठे येथे २०० झाडांची लागवड करून घेतले दत्तक

## बाभूळगाव कृषी महाविद्यालयाच्या वतीने कृषी दिनानिमित्त जनजागृती

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : जगदंबा शिक्षण संस्थेच्या बाभुळगाव येथील कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थी व प्राध्यापकांनी आज आपणासाठी येथे कृषी दिनानिमित्त दोनशे झाडांची लागवड करून हे झाडे दत्तक घेतले.कृषी दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये शेती आणि कृषी विषयी सकारात्मकता निर्माण करण्यासाठी प्रोत्साहनपर मार्गदर्शनही करण्यात आले. कृषी दिन निमित्त राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विशेष वृक्षारोपण कार्यक्रमाचे पन्हाळसाठे येथे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात आंबा, चिंच व सीताफळ या उपयुक्त व स्थानिक हवामानाला अनुरूप २०० झाडांची लागवड करण्यात आली.महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. व्हि.डी. शेंडे,प्राचार्य डॉ. डी. पी. कुळधर,उपप्राचार्य डॉ.एस.डी. म्हस्के,रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. व्हि. ठोंबरे व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. वृक्षारोपणाच्या माध्यमातून शेतीचे महत्व, पर्यावरण संवर्धनाबरोबरच फलोत्पादन वाढवण्याचा उद्देश ठेवण्यात आला असून या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शेती आणि पर्यावरणाची जाणीव निर्माण




होऊन समाजातही सकारात्मक संदेश पोहोचेल, असा विश्वास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. पी. कुळधर यांनी व्यक्त केला.या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त योगदान दिले. तसेच या कार्यक्रमाचे सर्व नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक आणि विद्यार्थ्यांनी केले. थकृषीदुतानी केली वडगावला जनजागृती बाभूळगाव येथील कृषी महाविदयालयातील चौथ्या वर्षातील कृषिदुतांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव उपक्रमांतर्गत वृक्षारोपण व कृषी सल्ला याविषयी मार्गदर्शन केले. कापसे फाउंडेशनचे संचालक बाळकृष्ण कापसे यांच्या सहयोगाने कृषी दीन साजरा करण्यात आला. त्यांच्या उपस्थितीत वृक्षरोपण कार्यक्रम राबवण्यात आला. त्यात गावकऱ्यांनी, विद्यार्थ्यांनी उस्फुर्तपणे भाग घेतला. जिल्हा परिषद शाळा वडगाव येथील मूख्यध्यापक व्ही.जी.निगुट व शिक्षक विद्यार्थांनी कृषीदिंडी काढून पर्यावरण संरक्षणसंबंधी जनजागृती केली. प्रगतीशील शेतकरी कारभारी कापसे, नितिन कुलकर्णी व शेतकरी उपस्थित होते.कृषी दिना निमित महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. व्हि. डी. शेंडे,प्राचार्य डॉ. डी. पी. कुळधर,उपप्राचार्य एस.डी.म्हस्के, कार्यक्रम अधिकारी प्रा.रोहम तसेच कृषिदुत विद्यार्थी राकेश हसले,तेजस जाधव,अभिषेक लहामगे,सिद्धेश कवडे,अनिकेत देशमुख,आनंदा गांगुर्डे,प्रसाद पवार, अमित नागरे,विनायक गायकवाड,विशाल सोनवणे यांनी नियोजन केले.ग्रामस्थांनी या वृक्षांचे संगोपन करण्याचे वचन दिले.

# जिजामाता गर्ल्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, सटाणा येथे आंतरराष्ट्रीय लोकसंख्या दिन साजरा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

सटाणा : मराठा विद्या प्रसारक समाज संचालित जिजामाता गर्ल्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, सटाणा येथे ११ जुलै रोजी आंतरराष्ट्रीय लोकसंख्या दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये लोकसंख्येचे वाढते प्रमाण, त्याचे परिणाम आणि त्यावरील उपाययोजना याबाबत जनजागृती निर्माण करणे हा होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या सौ. संगीता सोनवणे होत्या. यावेळी पर्यवेक्षक श्री. पवार व श्री. ढेपले तसेच ज्येष्ठ शिक्षक व शिक्षिका उपस्थित होत.

कार्यक्रमाची सुरुवात इयत्ता नववीच्या वैष्णवी दुसाने हिच्या मनोगताने झाली. तिने वाढती लोकसंख्या ही सामाजिक आणि पर्यावरणीय समस्या कशी बनत आहे यावर सखोल प्रकाश टाकला. त्यानंतर




इयत्ता सहावी 'अ' मधील तनिष्का खैरनार हिने आपल्या लहानशा पण विचारप्रवर्तक भाषणातून लोकसंख्येचे दैनंदिन जीवनावर होणारे परिणाम स्पष्ट केले.

ज्येष्ठ शिक्षिका सौ. पाटील यांनी वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होणाऱ्या अन्नधान्य टंचाई, शिक्षण, रोजगार, आरोग्य सेवा यासारख्या गंभीर विषयांवर सखोल भाष्य केले. त्यांनी लोकसंख्या नियंत्रणासाठी जनजागृती, शिक्षण आणि कुटुंब नियोजनाच्या गरजेवर भर दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी पर्यवेक्षक श्री. ढेपले सर यांनी विद्यार्थिनींना उद्देशून भाषण करताना लोकसंख्यावाढीचे जागतिक परिणाम समजावून सांगितले. त्यांनी सुजाण नागरिक म्हणून प्रत्येकाने जबाबदारीने विचार करण्याची गरज अधोरेखित केली.

या उपक्रमात विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सामाजिक विज्ञान विभागाने विशेष मेहनत घेतली.

# जिजामाता गर्ल्स हायस्कूल, सटाणा येथील विद्यार्थिनींना गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त

**दै. आवाज वृत्तसेवा...**

सटाणा : मराठा विद्या प्रसारक समाज संचालित जिजामाता गर्ल्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, सटाणा येथील दोन विद्यार्थिनींनी इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२४-२५ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे. कुमारी भामरे संपता राहुल हिने २९८ पैकी २४३ गुण, तर कुमारी भामरे आरोही देवेंद्र हिने २९८ पैकी २३४ गुण मिळवत गुणवत्ता शिष्यवृत्तीस पात्र ठरल्या. या दोन्ही विद्यार्थिनींनी विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची चमक पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

या यशाबद्दल विद्यालयात विशेष गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या सौ. संगीता सोनवणे होत्या. यावेळी शाळेचे पर्यवेक्षक श्री. पवार सर, श्री. ढेपले सर तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.




विद्यार्थिनींच्या या यशामध्ये मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांनी मोलाची भूमिका बजावली. श्री. डी. पी. रौंदळ, श्रीमती एस. व्ही. चव्हाण, श्रीमती व्ही. डी. चव्हाण आणि श्रीमती ए. एस. कोकाटे यांचा याप्रसंगी सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमात सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# सेंट्रल रेल्वे मजदूर संघाची मनमाड येथे बैठक संपन्न




**दै. आवाज वृत्तसेवा...**

आज रोजी सायंकाळी ५ वाजता एडीईएन मनमाड यांच्या कार्यालयासमोर सेंट्रल रेल्वे मजदूर संघ, कारखाना शाखा मनमाड यांच्या वतीने गेट मिटिंगचे आयोजन करण्यात आले. गेट मिटिंग वर्कशॉपमधील कामगारांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला असून, अनेक गंभीर समस्यांवर आवाज उठविण्यात आला. याप्रसंगी प्रकाश बोडके महेंद्र चौथमल व नितीन पवार कामगार समस्यांवर प्रकाश टाकला प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे होते: १. वर्कशॉप मधील सर्व शेडचे पत्रे तुटलेले आहे त्यामुळे थोड्याच पावसात मोठ्या प्रमाणात गळती होते त्यात महागड्या मशिनरी भिजून खराब होतात व कामगारांना काम करण्यास अडथळा निर्माण होतो

२. वर्कशॉपमध्ये येण्याजाण्याचा रस्ता अत्यंत खराब:
या खराब रस्त्यामुळे कामगारांना ये-जा करताना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तात्काळ दुरुस्तीची गरज व्यक्त करण्यात आली.

३. आरओ वॉटर आणि पिण्याच्या पाण्याची समस्या:
पिण्याचे पाणी आणि आरओ यंत्रांची स्थिती खराब आहे. नियमित देखरेख आणि दुरुस्तीची मागणी केली गेली.

४. सॅप्टी टँक मध्ये दुर्गंधी व स्वच्छतेचा अभाव:
सेप्टी टँक वर झाकण नाही सडलेल्या स्थितीत असल्याने मच्छरांचा उपद्रव वाढला आहे.


५. कॉलनीत वाढलेली गवताची झाडे:
कॉलनीमध्ये गवत खूप वाढल्यामुळे साप-गोणस इ. प्राण्यांचा धोका वाढला आहे. तातडीने स्वच्छतेची मागणी करण्यात आली.

६. रेल्वे वसाहतीत अपूर्ण कामे:
अनेक घरांमध्ये छत गळत आहे आणि मरम्मतीची कामे अर्धवट सोडण्यात आली आहेत. कामगारांच्या या मागण्या लवकरात लवकर सोडवाव्यात, अन्यथा पुढील आंदोलनात्मक पावले उचलण्यात येतील, असा इशारा यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला यावेळी शाखेचे चेअरमन महेंद्र चौथमल सेक्रेटरी गणेश हाडपे, डेलिगेट नितीन पवार वर्किंग चेअरमन प्रकाश बोडके खजिनदार मुक्तार शेख वैभव काकडे प्रीतम मंत्री गफार सय्यद हेमंत माळी हेमंत सांगळे सोमनाथ सनस सोमनाथ राजनोर योगेश शेरेकर ब्रिजेस विशाल महाजन दीपक सांगळे रवी कांदे प्रवीण सुरळकर रवी चर्वतूर राकेश खैरे भास्कर थोरे गौतम वाघ अमोल खाडे संतोष शिलावट खुमनलाल नर्वेदी साहेब संतोष पांडे सुनील शिंदे शुक्ल साहेब नेतराम मीना विकास कुमार मुकेश कुमार रवी कागे स्वप्नील महाजन कुशवाह साहेब राजू खरे अरुण कलवार राम आहेर श्याम कापडणे इच्छाराम माळी सईद शेख निरज कुमार इतरही कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते

# विंचूर येथे गुरु पौर्णिमा साजरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात आज गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी केली गेली. गुरुपौर्णिमा निमित्त महाविद्यालयात व्याख्याते श्री. अमोल दरेकर यांचे व्याख्यान आयोजित केले गेले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कर्मवीर भाऊराव पाटील आणि लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते केले गेले. त्यानंतर आपल्या गुरुजनांचे ऋणानुबंध जपत विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांचे पुष्प देऊन स्वागत करत आशीर्वाद घेतले. त्यानंतर डुंबरे श्रुती, मुद्गुल साक्षी, शिंदे प्राजक्ता या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. व्याख्याते अमोल दरेकर यांनी आपल्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना गुरुचे महत्व पटवून दिले. तसेच जीवनात यशस्वी होण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व आपल्या स्वअनुभव विद्यार्थ्यांना सांगितले. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य देवढे एन. ई. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास विद्यालयाचे उपप्राचार्य वाबळे सर, संस्थेचे लाईफ मेंबर चांदे आर. के., पर्यवेक्षक माळी सर, सांस्कृतिक विभाग प्रमुख महाडदेव बी. के., पाटील के. एस., गवारे एस. डी., काशीद एस. ए., गायकवाड एस. पी. बैरागी बी. एम., गंधे एस. व्ही. व सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थी बहूसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ठुबे ज्ञानदा व गुंजाळ शिवानी यांनी केले. तर आभार प्रदर्शन विभाग प्रमुख टिळेकर आर. टी. यांनी केले.



## पुढेच पुढे

थांबा थांबा
चौक आला
हार फुले
गोळा केले

नको वाजंत्री
नको फटाके
थांबवू ऱ्हास
पर्यावरणाचा

अजातशत्रू
चौक उभारू
सुपंथ धरू
मार्ग दाखवू

शांतता ठेऊ
नको हॉर्न
पुढेच पुढे
चला मिळून

सुभाष राघू आढाव
गोवंडी, मुंबई
मो.७४९९४१३०८६